
# तिफण

वर्ष : १४ वे । अंक ४ था

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च - २०२३

ISSN 2231-573X

UGC Care Listed Journal

# यशवंतराव चव्हाण विशेषांक

Shot on Y91

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १४ वे, अंक - ४ था

जानेवारी - फेब्रुवारी - मार्च २०२३

भाग - १

**UGC Care Listed Journal**
**ISSN 2231 - 573X**

◆ संपादक ◆

डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार' श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३१४०३, मो. ९९०४००३९९८

# भाग - १ अनुक्रमणिका


| अनु क्र. | लेख व लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | चरित्र संपन्न व्यक्तिमत्त्व यशवंतराव<br>प्रा. डॉ. भानुसे कारभारी लक्ष्मण | १-५ |
| २ | आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीचे शिल्पकार : यशवंतराव चव्हाण<br>बालाजी गंगावणे | ६-१२ |
| ३ | यशवंतराव चव्हाण यांचे बहुआयामी कारकीर्द : एक अभ्यास<br>प्रा. डॉ. गोवर्धन कृष्णाहरी दिकोंडा | १३-१५ |
| ४ | यशवंतराव चव्हाण व्यक्ती आणि विचार<br>प्रा. डॉ. गीतांजली वी. भोराडे | १६-२० |
| ५ | यशवंतराव चव्हाण : एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व<br>डॉ. संजय जीवनलाल सिंगनजुडे | २१-२७ |
| ६ | यशवंतराव चव्हाण यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्वाचा अभ्यास<br>डॉ. अंकुश रामचंद्र बनसोडे | २८-३३ |
| ७ | ज्ञानमंदिर उभारणारा नेता : यशवंतराव चव्हाण<br>प्रा. डॉ. दिवेकर रेश्मा रमेश | ३४-३७ |
| ८ | आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक योगदान<br>प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम | ३८-४४ |
| ९ | आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत यशवंतराव चव्हाण यांचे योगदान<br>डॉ. दत्तात्रय पांडुरंग खराडे | ४५-४९ |
| १० | यशवंतराव चव्हाण - कुशल प्रशासक<br>डॉ. गणेश बालासाहेब बनसोडे<br>डॉ. एन. वी. आघाव | ५०-५३ |
| ११ | यशवंतराव चव्हाण यांच्या विचार व कार्याचा ऐतिहासिक वारसा<br>डॉ. एस. आर. कट्टीमनी | ५४-५९ |
| १२ | आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीत यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक योगदान<br>प्रा. डॉ. साळुंखे यु. ए.<br>श्री. अतुल शहाजी देशमुख | ६०-६३ |

# १. चारित्र्य संपन्न व्यक्तिमत्व : यशवंतराव चव्हाण

प्रा. डॉ. भानुसे कारभारी लक्ष्मण
इतिहास विभाग, शिवाजी महाविद्यालय, कन्नड, औरंगाबाद.

## प्रस्तावना

यशवंतराव चव्हाण यांचे जीवन म्हणजे देवराष्ट्रे सारख्या एका लहान गावातील व गरीब घरातील मुलाने आपल्या कुटुंबीयांच्या व मित्रांच्या मदतीने परंतु प्रामुख्याने स्वतःच्या हिमतीने बुद्धिमत्तेने व कर्तृत्वाने राष्ट्रीय नेतृत्वाचे शिखर गाठण्याची जी किमया केली त्याची महाराष्ट्राला मिळालेली एक लक्ष वेधक कहाणी आहे. यशवंतराव चव्हाण यांचे चरित्र संपन्न व्यक्तिमत्व जर अभ्यासाचे असेल तर त्यांची वैचारिक पातळी, त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण, कायद्याच्या पदवी मधील शिक्षण, सातारा जिल्ह्यातील 1942 च्या चळवळीमधील सहभाग त्यानंतर वेणूताई चव्हाण यांच्या बरोबरीचा प्रवास, नंतर ओढावलेला कौटुंबिक आघात, 1946 ची निवडणूक त्यांचा मुख्यमंत्री बाळ गंगाधर खेर यांच्या मंत्रिमंडळातील संसदीय सचिव या पदावर त्यांनी केलेला प्रवेश, पुढे महाराष्ट्र वर नेहरू यांची निवड करण्याची वेळ आली तर मी नेहरूंची निवड करीन असे यशवंतरावांचे विधान व त्यासाठी सोसावी लागणारी परिस्थिती या सर्वांची ओळख व्हावी व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील यशवंतरावांची भूमिका वेगळया पद्धतीतून त्यांचं व्यक्तिमत्व समोर यावं हाच या पाठीमागचा उद्देश आहे. 1962 च्या भारत चीन संघर्ष नंतर यशवंतरावांच्या जीवनाला एक वेगळे वळण मिळाल. आधीचे संरक्षण मंत्री श्रीकृष्ण मेनन यांच्या राजीनाम्या नंतर पंडित नेहरूनी संरक्षण मंत्री म्हणून यशवंतरावांची निवड केली. व त्यानंतर 22 वर्षे कृष्णाकाठच्या यशवंतरावांनी यमुना तीरी दिल्लीच्या राजकारणात व्यतीत केली. पुढे 1969 मध्ये राष्ट्रपतींच्या निवडणुकीमध्ये झालेल्या गुंतागुंती व समज गैरसमज 1975 मध्ये आणीबाणीच्या वेळी यशवंतरावांची झालेली कुचंबना आणि यशवंतरावानसारखा महाराष्ट्राचा नेता पंतप्रधान पदापर्यंत पोहोचला नाही याविषयी मराठी माणसाला वाटणारी खंत ही एक महाराष्ट्राच्या इतिहासातील राहिलेली चणचण आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीचे एक शिल्पकार, कर्तव्यदक्ष प्रशासक, चतुर राजकारणी, साहित्याचे रसिक, संवेदनशिल माणूस, एक अथांग विचाराचा माणूस म्हणजे यशवंतराव चव्हाण होय महाराष्ट्र मध्ये तसं पाहिलं तर अनेक महापुरुष होऊन गेलेले आहेत आणि महाराष्ट्राने दिलेले आहेत त्यापैकी एक यशवंतरावजी चव्हाण नक्कीच आहेत. मराठी भाषिक राज्याचे पहिले मुख्यमंत्री, राष्ट्राच्या कठीण प्रसंगी पंडित जवाहरलाल नेहरूंच्या हाकेला ओ देणारे संरक्षण मंत्री, आणि विशाल दृष्टी असलेला एक धुरंधर महापुरुष, या विविध भूमिकांमुळे यशवंतरावजींचे नाव हे महाराष्ट्रामध्ये आणि देशांमध्ये अजरामर झालेले आहे.

## कौटुंबिक प्रवास

यशवंतराव चव्हाण यांचा जन्म देवराष्ट्र येथे 12 मार्च 1913 रोजी झाला. सातारा जिल्ह्यातील कराड शहरापासून जवळ असलेल्या या गावी यशवंतरावांचे आजोळ होते. काही दशकापूर्वी सातवाहनांच्या राज्यानंतर छोटी मोठी राज्य उदयाला आली त्यात देवराष्ट्र हे एक होत. त्याची राजधानी होती कौडिण्यपुर, नंतर तिचे नाव कुंडल पडले. देवराष्ट्रे यांचं कुबेर असेही नाव होत. असा उल्लेख येतो. यशवंतरावांनी पदवीनंतर पुढे वकिलीचा शिक्षण घेऊन काही काळ वकिली सुद्धा केली होती. ते शाळेत असतानाच वेगवेगळ्या वादविवाद वक्तृत्व स्पर्धेमध्ये भाग घेत असत आणि ते शाळेत असताना त्यांनी ग्रामीण सुधारणा या विषयावर भाषण दिलं

होत पुढे महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये त्यांना विकासाचा मुद्दा म्हणून ग्रामीण सुधारणा हाच आयुष्यभर होता, नंतरच्या काळात एक

यशस्वी वक्ता म्हणून त्यांनी नावलौकिक मिळवला होता. पुढे खानापूर ते दिल्ली असा प्रवास वेणूताई सोबत केला .

**यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू**

यशवंतराव चव्हाण यांनी 1930 आणि 1932 सालच्या कायदेभंगाच्या चळवळीत सक्रिय सहभाग घेतला त्यात त्यांना 18 महिन्यांचा कारावास भोगाव लागला. पुढे 1930 ते 1945 या कालखंडात यशवंतरावांनी स्वातंत्र्याच्या आंदोलनात सहभाग नोंदवला त्यामध्ये सुद्धा अनेक वेळा त्यांना शिक्षा भोगावी लागली. तरीसुद्धा त्यांनी कारागृह हे एक प्रकारचे विद्यापीठ असे समजून त्यांनी राजकीय आणि सामाजिक तत्त्वज्ञानाचे व समाजवादाचे मौलिक अध्ययन केले. आणि बंदी शाळा हेच त्यांचे विद्यापीठ बनले त्यांच्यावर लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, एम एन रॉय, कार्ल मार्क्स, जवाहरलाल नेहरू यांच्या लेखनाचा प्रभाव होता. संयुक्त महाराष्ट्राच्या रूपाने एक ज्वलंत प्रश्न या महाराष्ट्रात निर्माण झाला असता दोन विचारप्रवाह उभे राहिले आणि त्यामध्ये आपण कुठल्या बाजूने उभे राहिल पाहिजे, वाटेल तो त्याग करण्याच्या बाबतीत कधीच पाठीमागे राहिले नाही. यशवंतराव चव्हाण यांच्या बाबतीत नेहमीच एक गोष्ट सांगितली जाते ते शाळेत शिकत असताना टिळक हायस्कूलमध्ये वरिष्ठ माणूस वर्गात येतो आणि यशवंतराव चव्हाण यांना विचारतो. तू कोण होणार वास्तविक पाहता सातवीत शिकत असलेला मुलगा काय उत्तर देणार. त्यांनी त्या वरिष्ठांना दिलेलं उत्तर अतिशय महत्त्वाच आहे. ते म्हणाले मी यशवंतराव चव्हाण होणार. इतक्या लहान वयात मी यशवंतराव चव्हाण होणार ही आत्मविश्वासाची गोष्ट बोलून दाखवणे म्हणजे त्यांचं उत्तुंग व्यक्तिमत्व हे प्रदर्शन जाणवत. संयुक्त महाराष्ट्राच्या वेळी एक वाद निर्माण झाला हे राज्य कोणाचे मराठ्यांचे की मराठीचे तेव्हा सांगलीमध्ये सभा झाली आणि यशवंतरावजी उभे राहिले व स्पष्टपणे खंबीरपणे बोलले की हे राज्य मराठ्यांचे नाही हे राज्य मराठीचे आहे. हा त्यांचा खंबीर बाणेपणा सुद्धा महत्त्वाचा आहे.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले तेव्हा ते कधीच अभिमानाने किंवा गर्वाने वागले नाहीत. हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा खास पैलू. ते एक साधारण माणूस म्हणून वागले आणि ते एक उत्कृष्ट वाचक म्हणून वागले व त्यांच्या मागेपुढे सदैव पुस्तकाचे गट्टे राहत असत. एकदा मिरजेतील एका राजाने त्यांना घरी चहापाण्याला बोलावल मी कोणती मोठा वाचक आहे हे त्यांना सांगायच होत तेव्हा यशवंतरावांना त्यांनी जेव्हा किती पुस्तके वाचता असे विचारलं तेव्हा त्यांचं वाचनाचज्ञान बघून आपल्यापेक्षाही जास्त ज्ञानी पुरुष आहेत. यशवंतरावांना सुरुवातीपासूनच अविश्वास, अवमान, फितुरी, निंदा, टिका अशा अनेक प्रसंगातून त्यांच्या जीवनाचा प्रवास सुरू होता. यशवंतराव म्हणजे समाज परिवर्तनवादी लोकशाहीवादी राजकारणातील मुत्सदी संसद पट्टू म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांना विदवानाच्या संगतीची आवड तर होतीच, पण त्याचबरोबर सामान्य अडाणी माणसांची आवड त्यांना प्रचंड होती. गरिबाकडे ते अधिक लक्ष द्यायचे. शेतकरी हा त्यांचा आत्मा होता. प्रत्येक व्यक्तीशी मानवतेच्या भूमिकेतून पाहत आणि बोलत असत .त्यांच्या बोलण्याला वास्तवतेचे अधिष्ठान प्राप्त झालेलं होतं. त्यांची भाषा अंतकरणाचा ठाव घेत असे आणि ते सर्व गोरगरीब जनतेवर मोकळेपणाने प्रेम करायला शिकलेले होते. राष्ट्रावर प्रेम करण्याची शिकवण ही त्यांची पहिली पायरी होती. त्यांच्याकडे संयमशीलता होती. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आदर्श पैलू म्हणजे विचारांचा पक्केपणा. आणि धडाडीने व्यक्त करण्याचा बाणा ही त्यांची दोन वैशिष्ट्ये होते. त्यांच्यावर महात्मा ज्योतिबा फुले, शाहू महाराज, लोकमान्य टिळक, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा पगडा होता. ते उत्तम प्रशासक होते हे त्यांनी सत्तेत पोहोचल्यावर दाखवून दिल. माणसे जोडणे हा त्यांचा उत्तम गुण होता. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रात असताना महात्मा फुले आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांना समोर

बहुजन समाजातील सर्व स्तरासाठी शिक्षणाची दारे खुली केली, औद्योगिक वसाहती निर्माण केल्या, साहित्यिक कलाकार विचारवंत व्यावसायिक यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला, कोणी आपला अवमान केला तर त्यांनी त्यांच्याशी पराकोटीने वागून कधीच पत्करले नाही. महाराष्ट्रातील अनेक नेत्यांना त्यांनी दिल्लीमध्ये नेले याचे उत्तम उदाहरण म्हणजे महाराष्ट्र हा देशहितासाठी कामी आला पाहिजे हाच. महाराष्ट्राचा जेव्हा स्वतंत्र अस्तित्व तयार झाले तेव्हा त्यांनी पूर्ण योगदान भारतासाठी देण्याचे ठरवले. यशवंतराव हे बहुजनांचे नेते होते आणि त्यांनी बहुजनांची व्याख्या करताना असे म्हटले होते, ज्यांची सुखदुःख समान आहेत ते म्हणजे बहुजन होय, कुठला एकादा वर्ग नाही किंवा समाज नाही आणि म्हणून यशवंतराव हे या समाजाचे प्रतिनिधी होते. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वात जागोजागी आशावादीत्व आढळते. निराशेच्या निबीड अंधकारातून त्यांचा आयुष्याचा प्रवास घडलेला आहे. परंतु निराशेचा कोणताही कठोर अनुभव त्यांना निराशेत दडवू शकला नाही. याचे कारण त्यांनी आपली दृष्टी नेहमीच प्राप्त परिस्थितीच्या आणि प्राप्तकालाच्या पलीकडे ठेवली.यशवंतरावांनी अखेरपर्यंत महाराष्ट्र धर्माची उपासना केली. मला वाटते यशवंतराव चव्हाणानंतर कोणत्याही नेत्यावर महाराष्ट्राने एवढं प्रेम केलं नसेल. यशवंतराव चव्हाण कैलास ट्रस्टचे संस्थापक होते. तेव्हा प्राप्तिकर खात्याने या ट्रस्टवर एक लाखाचा दंड ठरवला, तेव्हा त्या ट्रस्टच्या संस्थापक वेडेबाई यांनी वेणूताईच्या जवळ बसून कुठल्या नालायक अर्थमंत्र्यांनी असं केलं असं त्या बोलू लागल्या आणि शिव्या देऊ लागल्या तेव्हा स्वतः हात जोडून यशवंतराव त्यांच्यापुढे उभे राहतात आणि तो अर्थमंत्री मी आहे असं म्हणून त्यांना माफी मागतात आणि त्यांना मदत करतात हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्त्वाचा गुण होता. 1977 च्या फेब्रुवारीत काँग्रेसला हादरा देणाऱ्या निवडणुकीत यशवंतराव दिल्लीत होते निवडणुकीच्या निकालाचा त्यांनाही धक्काच बसला होता. आल्याबरोबर त्यांनी सचिवांना बोलवून घरातील सर्व कागदपत्रे नीट वाचून घेतली. सर्व व्हीआयपी व्यवस्था सरकार जमा केली. नाही तर आजकाल शासकीय निवासस्थान खाली करण्यासाठी सरकारला पत्र पाठवावे लागतात तरीसुद्धा राजकीय लोक शासकीय निवासस्थान खाली करत नाही हा इतिहास आहे. मुलापासून वयस्कर लोकांपर्यंत बहुतेक जण त्यांच्यासमोर अतिशय आदराने बसायचे, आणि ते सर्वांसोबत अतिशय मनमोकळे गप्पा मारायची आता असा व्यक्तिमत्त्वाचा माणूस देशाच्या आणि महाराष्ट्राच्या पटलावर दिसत नाही. त्यांनी आयुष्यात कधीच विरोधकावर विरोध म्हणून टीका केली नाही. म्हणून ते विरोधकाचे सुद्धा श्रद्धास्थान राहिलेले आहेत. टोकाचा विरोध जरी असला तरी आपण किती एखाद्या नेत्यावर प्रेम करावे याचे उत्तम उदाहरण म्हणजे, इंदिराजींचे जेव्हा निधन झालं तेव्हा ते म्हणाले इंदिराजी आणि माझ्यात बरेच मतभेद होते. पण खाजगी जीवनात आम्हाला एकमेकांबद्दल नितांत आदर होता. आणि आमची वैयक्तिक सुखदुःख सुद्धा प्रेमाने रागाने व्यक्त करता येईल असे व्यक्तिमत्त्व आता हरवले आहे असं ते अतिशय हळव्या मनाने उद्गारले.

**कौटुंबिक जीवन आणि शेवटचा प्रवास**

1965 ला झालेल पाकिस्तानशी युद्ध, लालबहादूर शास्त्री यांच्याबरोबर संरक्षण मंत्री म्हणून केलेल काम, आणि तास्कंदकरार येथे गेलेले यशवंतराव, शास्त्रीजींचे पार्थिवशरीर तास्कंदून घेऊन येणारे यशवंतराव या सगळ्या घटना नंतर यशवंतरावांच्या जीवनातील वेगळी स्थित्यंतरे आपणास पाहावयास मिळतात. हा घटनाक्रम पाहिल्यास उद्याचे पंतप्रधान यशवंतराव असंच नजरेसमोर येते. काही दिवसानंतर ते भारताचे गृहमंत्री झाले. आणि सरदार पटेल यांच्या जागी विराजमान झाले. ते नंबर एकचे भारताचे नेते होतील असे स्वप्न सर्वांनी उराशी बाळगलं पण, ते महाराष्ट्राच दुर्भाग्य होतं. यशवंतराव चव्हाण शेवटचा प्रवास करत होते तेव्हा ते दिल्लीला हॉस्पिटलमध्ये होते आणि तेथे इलाज होणार नाही असं कळाल्यानंतर मुंबईला हलवावं लागेल असे समजल्यावर

स्वतः पंतप्रधान राजीव गांधी त्या हॉस्पिटलमध्ये त्यांना भेटण्यास गेले, त्या हॉस्पिटलमध्ये डॉक्टरकडे जरा हलगर्जीपणा होतो हे कळाल्यावर राजीव गांधी यांनी त्यांची कान उघडणी केली आणि त्यांना आवश्यक तो उपचार करण्यास सांगितले. परंतु साहेबांची अवस्था पाहून त्यांच्या डोळ्यात पाणी आले, लवकर बरे व्हा निवडणुका जाहीर झाल्या आहेत मला तुमची गरज आहे. माताजी तर निघून गेल्यात असे राजीवजींच्या तोंडून ऐकतात साहेबांचे डोळे भरून आले. वेणूताई गेल्या तेव्हा नरडणारे साहेब मात्र आतात्यांचे डोळे पान्हाऊ लागले. पंधरा मिनिटानंतर निरोप घेताना राजीवजींनी सांगितलं की, काळजी करू नका कसली गरज भासली तर कळवा. मुंबईला जायचं असं ठरवलं तर विमान तयार ठेवतो. राजीव गांधी निघून गेल्यानंतर कितीतरी वेळ साहेब स्वस्त पडून होते. डोळ्यात अश्रू वाहत होते. तो संपूर्ण दिवस त्यांच्या मनात स्वतःच्या निवडणुकीपेक्षा एकूण देशाच्या निवडणुकीविषयीचे विचार करण्यातच मग्न होते. दिवसभर त्या संबधात बोलत होते निवडणुकीची तयारी कशी करायची याविषयी सांगत होते म्हणजे एखाद व्यक्तिमत्व आपल्या वैयक्तिक जीवनापेक्षा, आपल्या पदापेक्षा, देश हितासाठी विचार करतो ते व्यक्तिमत्व शब्दांमध्ये वर्णन करण शक्यच नाही 25 नोव्हेंबरच्या सकाळी साहेबांचा निवडणूक अर्जाचा फॉर्म भरला गेला. त्यांनी सह्या केल्या डॉक्टरांच्या आवश्यक ते सर्टिफिकेट जोडलं गेलं. आणि 26 ला वेळेवर अर्ज दाखल करावा असा त्यांचा आग्रह होता. यशवंतराव यांची प्रकृती अस्थिर होती. हे कळल्यावर महाराष्ट्रातील राजकारणातील विरोधक सुद्धा दिल्लीत पोहोचले. यशवंतराव त्यांना एवढंच म्हणाले महाराष्ट्रात निवडणुका लागल्या तुम्ही दिल्लीत काय करता. तेवढ्यात मुंबईवरून डॉक्टरची टीम दिल्लीला पोहोचली. बोलता बोलता साहेबांच्या आयुष्याची दोरी तुटली होती.आता डॉक्टर येथे येऊन काय करणार. डॉक्टर असले काय आणि नसले काय. दहा मिनिटातच पंतप्रधान राजीव गांधी आले अंत्यदर्शन घेतलं, चौकशी केली, मुंबईला नेणार म्हणून सांगितलं तेव्हा राजीव गांधी म्हणाले दिल्लीत साहेबांची माणसं आहेत. पार्थिव काही काळ इथेच ठेवा आणि काही वेळातच साहेबांच्या न्यूज निवासस्थानी दुःखितांची रीग लागलेली. राष्ट्रपती आले, मंत्री आले, लष्करी व शासकीय अधिकारी आले. दिल्लीतले महाराष्ट्रीयन आले पत्रकार आले. आणि जेव्हा पार्थिव विमानतळावर आले तेव्हा राजीव गांधी यांनी साहेबांचा अखेरचा निरोप घेतला. 22 वर्षापूर्वी नोव्हेंबर मध्ये साहेब दिल्लीत पोहोचले आणि आता दिल्लीतच नव्हे तर जग सोडून नोव्हेंबरमध्येच पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी बोटाला धरून साहेबांना दिल्लीत आणलं पंडितजींच्या नातवाला आपल्या त्याच बोटाचा आधार देऊन दिल्लीत उर्वरित कालक्रम करावा असा निश्चित विचार करून उतरत्या वयातही निवडणुकीतील आखणी कशी करावी हे सगळं गुपितच वेनुताईच्या रूपाने एक जून1983 ला यशवंतरावांच्या वृंदावनातील तुळस दिल्लीतून निघून गेली.उरलंस उरलं वृंदावनही पृथ्वीन १९८५ आता पोटात घेतलं नियतीला पुढचं काही घडवायचं नसावं. नशीब महाराष्ट्राचं म्हणून असा हा थोर देशभक्त, रसिक मनाचा मोठा नेता, आणि व्यवहारी राजकारणी, कृष्णा कोयनेच्या संगमाच्या ठिकाणी निरंतरचा पडला आहे. आत्मीयता निर्माण करणारे संगमावरील हे स्थान म्हणजे त्यांच्या भूतकाळाच्या वाटेवरील विश्रांतीची जागा होय.

**निष्कर्ष व समारोप**

महाराष्ट्र सर्वतोपरीन सार्वभौम घडविणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे यशवंतराव चव्हाण होय. आणि असे चरित्र व सर्व गुण संपन्न व्यक्तिमत्व याचा आढावा घेतल्यास असच म्हणाव लागेल, यशवंतराव हे एक आदर्श व्यक्तिमत्व, जनमानसातील वेगळेपण असलेले दातृत्व, समन्वयी व्यक्तिमत्व, सत्तेत नसले तरी महाराष्ट्राचे यशवंतराव, त्यांनी गाजवलेली राष्ट्रीय व्यासपीठ, सोज्वळ मानवतावादी राजकीय प्रवासातील वीर पुरुष, भारताच्या राजकीय मंचावरील चारुदत्त, मंत्रालयातील काम करण्याची पद्धत, बिकट काळातील

त्याचा प्रवास, अर्थमंत्री म्हणून केलेले काम, हळुवार मनाचा सुसंस्कृत सभ्य राजकारणी, अंतरीची जाण असलेला माणूस, संगीताचा रसिक श्रोते, साहित्य क्षेत्रातील स्वयंभू व्यक्तिमत्व, दिल्लीतील महाराष्ट्र याची जाणीव करून देणारा माणूस, त्यांचं ग्रंथ प्रेम, साहित्यिकांबद्दल असता, त्यांचं वाचन, मराठवाडा विद्यापीठ व कोल्हापूर विद्यापीठ स्थापन करण्या पाठीमागची भूमिका, या सर्व गोष्टी लक्षात घेता असा निष्कर्ष येतो की असं चरित्र संपन्न व्यक्तिमत्व पुन्हा महाराष्ट्राच्य आणि भारताच्या इतिहासात होणे नाही. आणि म्हणून भारताच्या राजकीय आणि महाराष्ट्राच्या राजकीय सामाजिक सांस्कृतिक इतिहासात वावरणाऱ्या प्रतिनिधींना त्यांचे चरित्र म्हणजे एक महत्त्वाची शिकवण आहे. ती सर्व लोकांनी थोड्याफार प्रमाणामध्ये आत्मसात केली पाहिजे. चाळीस वर्षापेक्षा अधिक काळ राजकारणात आणि 25 30 वर्ष उच्च अधिकार पदं भूशविताना त्यांनी साहित्य, नाट्य, संगीत अधिक क्षेत्रातते व्यक्त झाले. ते एक उत्तम वक्ते होते. त्यांच्या प्रभावी आणि विचार प्रवर्तक भाषणाने सारा जनसमुदाय मंत्रमुग्ध होत असे. सह्याद्रीचे वारे आणि युगांतर हे त्यांच्या भाषणाचे संग्रह लोकप्रिय ठरले. कृष्णाकाठ हे त्यानी लिहिलेलं आत्मचरित्र तर उत्तम साहित्याचा एक नमुनाच मानावा लागतो. त्यांचं साहित्य जरी आत्मसात केलं तरी त्यांना खरी आदरांजली मिळेल. हेच या निमित्ताने सांगता येईल.

संदर्भ


१. ऋणानुबंध, प्रेस्टीज प्रकाशन, पुणे.

२. सह्याद्रीचे वारे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई.

३. चव्हाण यशवंतराव, कृष्णाकाठ, प्रेस्टिज प्रकाशन, पुणे.

४. चपळगावकर नरेंद्र, कर्मयोगी संन्यासी, मौज प्रकाशन, मुंबई.

५. फडके य.दी., विसाव्या शतकातील महाराष्ट्र .

६. वावर सरोजिनी, मी पाहिलेले यशवंतराव, महाराष्ट्र राज्य साहित्य
संस्कृती मंडळ, मुंबई.

७. यशवंतराव राष्ट्रीय व्यक्तिमत्व, भा. कृ. केळकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि
संस्कृती मंडळ, मुंबई.

८. माडगूळकर ग. दि. मंतरलेले दिवस साधना प्रकाशन, पुणे.